ePaper

# सध्याच्या अस्थिर राजकीय परिस्थितीकडे संधी म्हणून पाहा ; राज ठाकरे



| वर्ष - 6 । अंक - 136 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- अखिल चिंचवडगाव दहीहंडी उत्सव जल्लोषात!
- जनसंवाद सभेत प्लॅस्टिक मुक्तीचा निर्धार!
- "त्यांनी लाज लज्जा सगळं सोडलं," बंडखोरांवर उद्धव ठाकरेंनी डागली

www.mahaenews.com | ।मंगळवार ।दिनांक 23 ऑगस्ट 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# बिनबोभाट खरेदी!

## प्रशासकीय राजवटीत मनमानी?: ओपन जीमच्या साहित्यासाठी निविदा नाही

**पिंपरी।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

पिंपरी चिंचवड महापालिकेने शहरातील उद्याने, मैदान, पदपथ अशा ३४ ठिकाणी ओपन जीम ही संकल्पना राबवली आहे. त्यापैकी आठ ठिकाणी निविदा प्रसिद्ध न करता जीमसाठी साहित्य बसवून देण्यात येणार आहे. त्यासाठी ६६ लाख रूपये खर्च होणार आहे. प्रशासकीय राजवटीत हा बिनबोभाट निर्णय घेण्यात आला आहे.



महापालिकेच्या शहरात ८६ व्यायाम शाळा आहेत. अ, ब आणि क या वर्गानुसार व्यायाम शाळांचे धोरण तयार करण्यात आले आहे. याशिवाय महापालिकेने शहरात ठिकठिकाणी उद्याने, मैदान, पदपथ अशा ठिकाणीही ओपन जीम ही संकल्पना राबवली आहे.

मॉर्निंग वॉकसाठी जाणारे नागरिक मोठ्या प्रमाणात या ओपन जीमचा लाभ घेतात.

महापालिकेच्या क्रीडा विभागामार्फत आवश्यकतेनुसार विविध ओपन जीमसाठी साहित्य पुरवठा करून बसवून देण्यात येणार आहे. शहरात एकूण ३४ ठिकाणी या ओपन जीम उभारण्यात आल्या आहेत. या जीमसाठी साहित्य आवश्यक आहे.

### एका सेटसाठी साडे आठ लाखांचा खर्च...

क्रीडा विभागाच्या मागणीनुसार ७० लाख तरतुदीच्या मर्यादेत १३ प्रकारचे विविध ओपन जिम साहित्य प्रत्येकी ३४ नग ३४ ठिकाणी पुरवठा करून बसवून देण्यात येणार आहे. सध्या आठ ठिकाणांसाठी या साहित्याचा पुरवठा करण्याकरिता चार पुरवठादारांनी लघुत्तम दर सादर केले. त्यामध्ये पुण्यातील एड्यनिडस यांनी तीन बाबींसाठी प्रति नग एवूÂण २ लाख ३७ हजार रूपये दर सादर केला. ठाणे येथील बाबा प्ले वल्र्ड यांनी तीन बाबींसाठी प्रति नग १ लाख ५८ हजार रूपये दर सादर केला. ठाणे येथील हनी फन एन थ्रील कंपनीने तीन बाबींसाठी १ लाख ७६ हजार रूपये आणि पुण्यातील त्रिमुर्ती इंजिनिअरींग यांनी चार बाबींसाठी प्रति नग एकूण २ लाख ५५ हजार रूपये असा दर सादर केला. त्यानुसार, एका सेटसाठी ८ लाख २७ हजार रूपये खर्च होणार असून आठ ठिकाणी हे ओपन जिम साहित्य बसविण्यासाठी एकूण ६६ लाख २१ हजार रूपये खर्च होणार आहे.

---

# मार्च २०२३ पर्यंत मेट्रो पूर्ण क्षमतेने धावणार!

## डॉ. ब्रिजेश दीक्षित यांचा विश्वास : मेट्रो निओचाही विस्तार होणार

**पिंपरी चिंचवड।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

वनाज ते रामवाडी व पिंपरी ते स्वारगेट या मेट्रोचे दोन्ही मार्ग मार्च २०२३ पर्यंत सर्व काम पूर्ण होऊन १०० टक्के क्षमतेने सुरू होतील, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दीक्षित यांनी विश्वास व्यक्त केला. याचबरोबर महामेट्रो पुण्यामध्ये ४६ किलोमीटर मेट्रो व ३६ किलोमीटर मेट्रो निओ अशा ८२ किलोमीटरच्या विस्तारित मार्गावर काम करत असल्याचीही माहिती त्यांनी दिली. स्वातंत्र्यदिनी पुणे व पिंपरी - चिंचवड अशा दोन्ही मार्गावर मेट्रोला अभूतपूर्व प्रतिसाद दिल्याबद्दल दोन्ही शहरांमधील नागरिकांप्रती डॉ. दीक्षित यांनी आभार व्यक्त केले. मेट्रोचे प्रकल्प संचालक अतुल गाडगीळ, जनसंपर्क विभागाचे कार्यकारी संचालक हेमंत सोनवणे तसेच मेट्रोचे अन्य वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.मेट्रोच्या सिव्हिल कोर्ट येथील कार्यालयात डॉ. दीक्षित यांनी पत्रकारांना मेट्रोच्या कामकाजाची माहिती दिली. डॉ. दीक्षित म्हणाले, मार्च २०२३ पर्यंत मेट्रोच्या दोन्ही मार्गाचे काम पूर्ण होणे अपेक्षित आहे. भुयारी मार्ग सुरू होण्याला त्यापेक्षा थोडा जास्त कालावधी लागू शकतो.



# अखिल चिंचवडगाव दहीहंडी उत्सव जल्लोषात!

## शितलादेवी गोविंदा पथकाला मान : ॲड. मोरेश्वर शेडगे यांचे आयोजन





**पिंपरी । ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

**पिंपरी-चिंचवड शहरातील मानाची पारंपरिक दहिहंडी म्हणून ओळखली जाणारी स्वीकृत नगरसेवक अ‍ॅड.मोरेश्वर शेडगे मित्र परिवार आयोजित 'अखिल चिंचवडगाव सार्वजनिक दहिहंडी उत्सव समितीची दहिहंडी फोडण्याचा मान मुंबईच्या चेंबूर येथील 'शितलादेवी गोविंदा पथकास' मिळाला.**

या दहीहंडी महोत्सवाची सुरवात चिंचवडगावातीलच 'श्री वरदहस्त' पारंपारिक ढोल ताशा पथकाच्या वादनाने झाली. मुंबई चेंबूर मधील शितळादेवी गोविंदा पथक व पिंपरी चिंचवड मधील ताथवडे गावातील 'नृसिंह गोविंदा पथकाने' चित्तथरारक कसरंतीचे प्रदर्शन व स्पर्धा करीत सलामी देत प्रेक्षकांची मने जिंकली. शेवटी चेंबूरच्या 'शितलादेवी' गोविंदा पथकाने दहिहंडी फोडण्याचा मान मिळवला. दहिहंडी महोत्सवाचे संयोजक ॲड. मोरेश्वर शेडगे यांच्या वतीने 5,55,555 रुपयांचे बक्षीस व ट्रॉफी या गोविंदा पथकास देण्यात आली.

'तू तेव्हा अशी' या सुप्रसिद्ध मालिकेतील 'पुष्पावल्ली' म्हणजेच प्रसिद्ध मराठी अभिनेत्री 'अभिज्ञा भावे' हे या दहिहंडीचे मोठे आकर्षण होते. यावेळी टाटा मोटोर्स युनियन चे माजी अध्यक्ष व जेष्ठ भाजपा नेते पै. ज्ञानेश्वर शेडगे, समितीचे मार्गदर्शक दत्ताभाऊ चिंचवडे, चापेकर स्मारक समितीचे सदस्य गतिराम भोईर, भाजपा प्रदेश सदस्य संतोष कलाटे, पै.विजय गावडे, मनपा ब' प्रभाग स्वीकृत सदस्य विठ्ठल भोईर, महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे शहराध्यक्ष हेमंत डांगे, मनपा कर्मचारी महासंघाचे मा.अध्यक्ष अंबर चिंचवडे, भाजपा शहर उपाध्यक्ष पाटीलबुवा चिंचवडे, शेखर चिंचवडे, विनोद मालू, भाजयुमोचे प्रदेश सदस्य अजित कुलथे, भाजपा शहर सचिव मधुकर बच्चे, भाजपा जेष्ठ नेते रविंद्र देशपांडे, कामगार नेते हरीभाऊ चिंचवडे, भाजपा व्यापार आघाडीचे शहराध्यक्ष राजेंद्र चिंचवडे, भाजपा मंडलाध्यक्ष योगेश चिंचवडे, मंडल सरचिटणीस रविंद्र प्रभुणे, तेली समाजाचे युवा शहराध्यक्ष विठ्ठल सायकर, टाटा मोटोर्स युनियनचे उपाध्यक्ष नयन पालांडे, सामाजिक कार्यकर्ते दत्ता चिंचवडे, राघूशेठ चिंचवडे, सुनिल लांडगे, महेश लांडगे, सुरज भोईर, स्वप्निल देव, राजन पाटील, अख्तर पिंजारी, वरद देव, मयुर देव आदी प्रमुख मान्यवर उपस्थित होते.

### आमदार उमा खापरे यांचा विशेष सन्मान...

**दरम्यान पिंपरी चिंचवड शहरातील पहिल्या महीला आमदार उमाताई खापरे या विधानपरिषदेवर निवडूण आल्याबद्दल तसेच भाजपा चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख शंकर जगताप, मनपा सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके, जेष्ठ नगरसेवक चंद्रकांत नखाते, नगरसेवक शत्रुघ्न काटे यांचा यावेळी नगरसेवक ॲड. मोरेश्वर शेडगे यांच्या वतीने विशेष सन्मान करण्यात आले.**

# निकृष्ट काम करणाऱ्या ठेकेदारांना काळ्या यादीत टाकणार

## खासदार सुप्रिया सुळे यांचे निकृष्ट काम करणाऱ्या ठेकेदारांसाठी सूचक वक्तव्य

**वेल्हे। ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**



वेल्हे तालुक्यामध्ये विविध विकास कामांसाठी कोट्यावधी रुपयांचा निधी येत असला तरी अनेक ठेकेदार निकृष्ट दर्जाची कामे करत असल्याची तक्रार नागरिकांनी करताच खासदार सुप्रिया सुळे यांनी केलेल्या कामाची चौकशी करून संबंधित ठेकेदारांना काळ्या यादीत टाकण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना सूचना करणार असल्याचे स्पष्ट केले .

खासदार सुप्रिया सुळे यांनी शिव गोरक्ष मंगल कार्यालय वेल्हे येथे सोमवार, (ता. २२) रोजी तालुक्यातील विविध विभागांच्या कामाच्या आढावाची बैठक आयोजित केली होती.

यावेळी नागरिकांनी केलेल्या तक्रांबाबत बोलताना सुळे यांनी निकृष्ट काम करणाऱ्या ठेकेदारांसाठी सूचक वक्तव्य केले. या बैठकीला जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष रणजीत शिवतरे, जिल्हाध्यक्ष प्रदीप गारटकर, महिला जिल्हा अध्यक्षा भारती शेवाळे, पुणे जिल्हा बँकेचे संचालक रेवणनाथ दारवटकर, संचालिका निर्मला जागडे, कात्रज दूध संघाचे संचालक भगवानराव पासलकर, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष संतोष रेणुसे, माजी अध्यक्ष शंकरराव भुरुक, महिला अध्यक्षा किर्ती देशमुख, जिल्हा उपाध्यक्ष किरण राऊत, बारामती मतदार महावितरणचे समन्वयक प्रवीण शिंदे, केळदचे सरपंच रमेश शिंदे, युवक कार्याध्यक्ष संदीप खुटवड, अंकुश पासलकर, प्रमोद लोहकरे, विकास नलावडे, सुधीर रेणूसे, गोरख भुरुक, राजूअप्पा रेणुसे, भोरचे उपविभागीय अधिकारी भोरचे उपविभागीय अधिकारी राजेंद्र कचरे तहसीलदार शिवाजी शिंदे, गटविकास अधिकारी पंकज शेळके, सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज पवार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता संजय सकपाळ, महावितरणचे, नवनाथ घाटुळे, गटशिक्षणाधिकारी कमलाकांत म्हेत्रे, गुंजवणी प्रकल्प जलसंपदा विभागाचे दिगंबर डुबल आदी उपस्थित होते.

# जनसंवाद सभेत प्लॅस्टिक मुक्तीचा निर्धार!

## नागरिकांच्या सूचना : गणेशोत्सवात कापडी पिशव्यांची जनजागृती करा




### अशा आहेत नागरिकांच्या सूचना...

सदर जनसंवाद सभेत नागरिकांनी विविध तक्रारी व सूचना मांडल्या. शहरात फेरीवाल्यांची संख्या वाढली आहे, नव्याने फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करून त्यांना परवाना देण्यात यावे, शहरात विविध ठिकाणी झाडांना लावण्यात आलेल्या संरक्षक जाळ्यांमुळे झाडांची वाढ खुंटली आहे, अशा झाडांच्या जाळ्या तात्काळ काढण्यात याव्यात, पिंपरी येथील स्मशान भूमीतील अतिक्रमण तात्काळ हटवण्यात यावे, जलवाहिन्यांचे अर्धवट असलेले काम पूर्ण करावे तसेच फुटलेल्या जलवाहिन्या दुरुस्त कराव्यात, कचरा संकलित करण्यासाठी घंटा गाडी पाठवावी, उघड्यावर कचरा टाकणाऱ्या नागरिकांवर कारवाई करावी, शहरात विविध ठिकाणची अतिक्रमणे काढण्यात आली आहेत, अशा ठिकाणी पुन्हा अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घ्यावी, रस्त्यात पडलेले खड्डे तात्काळ बुजविण्यात यावेत, रस्त्यांच्या बाजूने पथदिवे लावावेत, खाजगी जागेतील बांधकामामुळे रस्त्यावर राडारोडा पडून राहिल्यामुळे रहदारीस अडथळा निर्माण होत आहे, याबाबत संबंधित मालमत्ता धारकास दंड करावा, शहरात आवश्यक ठिकाणी सार्वजनिक शौचालय उभारावेत, रस्त्याच्या मध्यभागी आणि पदपथावरील निघालेले पेव्हिंग ब्लॉक तात्काळ बसवावेत, अशा सूचना व तक्रारी आज झालेल्या जनसंवाद सभेमध्ये नागरिकांनी मांडल्या.

**। पिंपरी ।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

घरोघरी तिरंगा उपक्रमांतर्गत फडकवण्यात आलेले राष्ट्रध्वज सन्मानपूर्वक उतरवून योग्य ठिकाणी ठेवावेत तसेच सार्वजनिक गणेश मंडळाच्या ठिकाणी प्लास्टिक मुक्ती आणि कापडी पिशवी वापरासंबंधी जनजागृती करणारे संदेश फलक लाऊन कापडी पिशवी वापरण्याचे आवाहन महापालिकेच्या वतीने नागरिकांना करण्यात यावे, अशा सूचना आज झालेल्या जनसंवाद सभेत नागरिकांनी मांडल्या.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने नागरिकांच्या आशा आणि आकांक्षांचे प्रतिबिंब महापालिकेच्या ध्येय धोरणे, विविध निर्णयात दिसावे तसेच शहरातील नागरिक आणि प्रशासन यांच्यामध्ये सुसंवाद राखण्यासाठी तसेच तक्रारींचे निवारण जलदगतीने करण्यासाठी जनसंवाद सभेचे आयोजन करण्यात येते. महापालिकेच्या आठही क्षेत्रीय कार्यालयांमध्ये आज जनसंवाद सभा पार पडली. महापालिकेच्या वतीने आज पार पडलेल्या जनसंवाद सभेत ६८ नागरिकांनी सहभाग घेऊन तक्रारवजा सूचना मांडल्या. यात अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह क्षेत्रीय कार्यालयामध्ये अनुक्रमे ११, ६, ७, ६, ९, ४, १४ आणि ११ इतक्या नागरिकांनी उपस्थित राहून आपले म्हणणे मांडले.

अ, ब, क, ड, ई, फ, ग, ह, या क्षेत्रीय कार्यालयांच्या जनसंवाद सभेचे अध्यक्षपद मुख्य समन्वय अधिकारी असलेले उप आयुक्त चंद्रकांत इंदलकर, अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप, पर्यावरण विभागाचे सह शहर अभियंता संजय कुलकर्णी, सह शहर अभियंता सतीश इंगळे, पाणीपुरवठा विभागाचे सह शहर अभियंता श्रीकांत सवणे, शहर अभियंता मकरंद निकम, सहायक आयुक्त प्रशांत जोशी, समाज विकास विभागाचे उप आयुक्त अजय चारठाणकर, यांनी भूषवले.

---

# ...तर देशाची आर्थिक स्थिती दीर्घकालीन सुधारेल!

## अच्युत गोडबोले : साहित्य अमृत ग्रंथोत्सवात व्याख्यान

**पिंपरी।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

शिक्षण, आरोग्य, रस्ते, पाणी, वीज विविध पायाभूत सुविधांमध्ये अपेक्षित खर्च करून त्या सुविधा तळागाळातील लोकांपर्यंत पोहचवल्यास आर्थिक स्थिती दीर्घकालीन स्वरुपात सुधारेल, असे मत प्रसिद्ध लेखक अच्युत गोडबोले यांनी व्यक्त केले. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव विविध उपक्रमांचे आयोजन करून साजरा करण्यात येत आहे. या निमित्त दि. १३ ऑगस्ट ते २१ ऑगस्ट २०२२ दरम्यान साहित्य अमृत ग्रंथोत्सव व व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानमालेचा समारोप प्रसिध्द लेखक अच्युत गोडबोले यांच्या व्याख्यानाने करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. या वेळी उप आयुक्त रविकिरण घोडके, महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवड अध्यक्ष राजन लाखे, उमेश पाटील यांच्यासह विद्यार्थी, नागरिक आदी उपस्थित होते.

अच्युत गोडबोले म्हणाले, भारतीची आर्थिक स्थिती ही अत्यंत बिकट आहे, यासाठी केवळ सध्याचे सरकार जबाबदार नसून जागतिकीकरणाचा योग्य पद्धतीने स्वीकार न केल्याने ही परिस्थिती निर्माण झाली आहे. जागतिकीकरणाचे अनेक फायदे झाले. निम्न मध्यमवर्ग मध्यमवर्गात गेला, मध्यमवर्ग उच्च मध्यमवर्गात गेला, मात्र ही प्रगती तळागाळातील लोकांपर्यंत पोहचली नाही, त्यामुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषण आणि आर्थिक विषमता निर्माण झाली, बेरोजगारी आणि अर्ध बेरोजगारी निर्माण झाली, प्रगती ठराविक शहरांपर्यंत मर्यादित राहिली, जीडीपी वाढीच्या तुलनेत अपेक्षित रोजगार निर्मिती झाली नाही, त्यामुळे भारताची आर्थिक परिस्थिती बिकट झाली. जागतिकीकरणाचे तोटे आणि फायदे दोन्ही झाले.

**अच्युत गोडबोले म्हणाले, भारतीची आर्थिक स्थिती ही अत्यंत बिकट आहे, यासाठी केवळ सध्याचे सरकार जबाबदार नसून जागतिकीकरणाचा योग्य पद्धतीने स्वीकार न केल्याने ही परिस्थिती निर्माण झाली आहे. जागतिकीकरणाचे अनेक फायदे झाले. निम्न मध्यमवर्ग मध्यमवर्गात गेला, मध्यमवर्ग उच्च मध्यमवर्गात गेला, मात्र ही प्रगती तळागाळातील लोकांपर्यंत पोहचली नाही, त्यामुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषण आणि आर्थिक विषमता निर्माण झाली, बेरोजगारी आणि अर्ध बेरोजगारी निर्माण झाली, प्रगती ठराविक शहरांपर्यंत मर्यादित राहिली, जीडीपी वाढीच्या तुलनेत अपेक्षित रोजगार निर्मिती झाली नाही, त्यामुळे भारताची आर्थिक परिस्थिती बिकट झाली.**

पूर्वेकडील देशांनी शिक्षण, आरोग्य, संशोधन यावर मोठ्याप्रमाणात खर्च केल्याने ते आज चांगल्या स्थितीत आहेत. या परिस्थितीतून भारताला बाहेर येण्यासाठी शिक्षण, आरोग्य, संशोधन, पायाभूत सविधा या क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागेल. त्या सुविधा तळागाळातील लोकांपर्यंत पोहचवल्यास भारत नक्कीच चांगल्या स्थितीत येईल. त्याचे लवकरच दीर्घकालीन सकारात्मक परिणाम दिसून येतील, असेही ते म्हणाले. महापालिकेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या साहित्य अमृत ग्रंथोत्सव आणि व्याख्यानमालेचा समारोप आज करण्यात आला.



## संपादकीय »

# वरून कीर्तन; आतून तमाशा...

***भ्रष्टाचार हा भारतीय मानसिकतेत मोठा आकर्षक विषय. त्यात हा कथित भ्रष्टाचाराचा मुद्दा राजकीय व्यक्तींबाबत असेल तर भारतीयांच्या कल्पनाशक्तीस बहर येतो.***

या संदर्भात अशी काही आकडेवारी फेकली जाते की आरोप करणाऱ्यांच्या आणि ते गोड मानून विश्वास ठेवणाऱ्यांच्या बौद्धिक अजागळपणाने डोळे दिपतात. बरे हे आरोप पुढे सिद्ध होऊन संबंधितांस शासन होतेच म्हणावे तर तसेही नाही. पण भ्रष्टाचाराचे आरोप एकमेकांवर करणे आणि ते सोयीस्करपणे खरे-खोटे मानून त्यानुसार तितक्याच सोयीस्करपणे भूमिका घेणे हे आपले वैशिष्ट्य. या भ्रष्टाचाराच्या आरोपांचा पुढे छडा का लागत नाही, हा प्रश्न आपणास पडेपर्यंत नव्या कोणा भ्रष्टाचार आरोपांत नैतिक भारतीय रममाण झालेले असतात. त्यामुळे बोफोर्स, टू जी दूरसंचार, व्यापम् आदी एकापेक्षा एक भारी भ्रष्टाचार प्रकरणांची फक्त चर्चा भारतीय मन लावून करतात. पण यातील एकही प्रकरण ना धसास लागले, ना त्याबाबत काही कोणी कारवाई केली. भ्रष्टाचार आरोपांच्या या देदीप्यमान मालिकेत आता आणखी एका प्रकरणाची भर पडते की काय, हा प्रश्न पडावा अशा घटना घडताना दिसतात.

हे प्रकरण आहे माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या काळात घडलेला देवास- अँट्रिक्स करार. ते सरकार सत्तेवर आल्यानंतर एका वर्षांत- २००५ साली- इस्रोची व्यावसायिक उपकंपनी अँट्रिक्स आणि २००४ साली बेंगळूरु येथे स्थापन झालेल्या 'देवास मल्टिमीडिया' कंपनीत करार झाला. त्यानुसार अँट्रिक्सने दोन उपग्रह बांधून अवकाशात प्रक्षेपित करणे अपेक्षित होते आणि त्या उपग्रहांच्या दळणवळण क्षमतेतील ९० टक्के कंपनलहरी देवासला उपलब्ध करून दिल्या जाणार होत्या. त्यांचा वापर देशांतर्गत उपग्रह प्रक्षेपणासाठी होणार होता. सुमारे हजार कोटी रुपयांच्या या कंत्राटाची वाटचाल पहिली सहा वर्षे व्यवस्थित सुरू होती. तथापि २०११ साली फेब्रुवारी महिन्यात मनमोहन सिंग सरकारने हा करार रद्द केला. यात दळणवळणासाठी वापरली जाणारी कंपनसेवा सुरक्षा यंत्रणांसाठी राखीव ठेवण्याचा निर्णय झाल्याने अन्य व्यावसायिक सेवांसाठी ती उपलब्ध करता येणार नाही, असे कारण दिले गेले आणि हा करार एकतर्फी रद्द झाला. हा काळ 'टू जी' दूरसंचार घोटाळा ऐन भरात असण्याचा. अण्णा हजारेंपासून बाबा रामदेवांपर्यंत चेकाळलेल्या समाजात नवा मेणबत्ती संप्रदाय उदयास आला तोही याच सुमारास. या वातावरणात देवास-अँट्रिक्स प्रकरण दूरसंचारशी जोडले गेले आणि यात तब्बल दोन लाख कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याचा आरोप केला गेला. ही दोन लाख कोटी रुपयांची रक्कम कोठून आली, कशी हाताळली जाणार होती, याचा कोणताही तपशील दिला गेला नाही.



## आनंदी सकाळ

# गुरुतत्त्व परावाणीच्या अतीत...

भागवत धर्माचे आधारस्तंभ असलेल्या नाथांच्या घराण्यात दत्तभक्ती होती. श्रीजनार्दन स्वामींनी एकनाथांच्या बालवयातच, प्रामाणिक सेवाभावावर प्रसन्न होऊन, दत्तात्रेयांचे तीन शिरे, सहा हात असे सगुण दर्शन घडविले. दत्तात्रेयांच्या सगुण रूपाकडे पाहून, या संप्रदायाला सगुण म्हणावे, की त्रिगुणात्मक त्रैमूर्ती दत्ताला निर्गुण म्हणावे? सत्व-रज-तम, उत्पत्ती-स्थिती-लय याला कारक असलेल्या ब्रह्मा, विष्णू, महेश या तिन्ही देवता दत्तावतारात एकरूप आहेत. या तीन देवता कार्यरूपाने सगुण आहेत व आश्चर्य असे, की दत्तरूपात हे त्रिगुण एकत्रित आहेत. ती त्रिगुणांची साम्यावस्था आहे, म्हणजे, जगताचे अस्तित्व नसलेली गुणातीत स्थिती. असा हा सगुण-निर्गुणाचा एकाच वेळी, एकाच रूपात दर्शन घडविणारा, स्मर्तुगामी दत्त सगुण-निर्गुणाचे मोठे विलक्षण रूप आहे. संत एकनाथ म्हणतात, 'नेति नेति शब्द न ये अनुमाना।' कार्य व कारण या शब्दांनीही दत्तात्रेयांचे अनुमान करता येत नाही.

# महाराष्ट्राचा शैक्षणीक टक्का घसरता



## भूमिका

उच्च शिक्षण संस्थांबाबत केंद्रीय शिक्षण मंत्रालयाकडून जाहीर करण्यात आलेल्या राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारीत (एनआयआरएफ) महाराष्ट्राच्या समोर आरसा धरला आहे

उच्च शिक्षण संस्थांबाबत केंद्रीय शिक्षण मंत्रालयाकडून जाहीर करण्यात आलेल्या राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारीत (एनआयआरएफ) महाराष्ट्राच्या समोर आरसा धरला आहे. शिक्षणात महाराष्ट्र अग्रेसर असल्याचा, पुणे हे शिक्षणाचे माहेरघर असल्याचा अभिमान गळून पडावा, अशी राज्याची स्थिती आहे.



देशातील उच्च शिक्षण संस्थांबाबत केंद्रीय शिक्षण मंत्रालयाकडून जाहीर करण्यात आलेल्या राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी (एनआयआरएफ) पाहिल्यानंतर महाराष्ट्राने अंतर्मुख होण्याची गरज आहे. शिक्षणात महाराष्ट्र अग्रेसर असल्याचा; तसेच पुणे हे शिक्षणाचे माहेरघर असल्याचा अभिमान गळून पडावा, यापुढे कितपत बाळगावा असा प्रश्नही यामुळे उपस्थित होतो. 'एनआयआरएफ'च्या सर्व याद्यांवर नजर टाकल्यानंतर काही गोष्टी प्रकर्षाने जाणवतात. पहिली : तमिळनाडूने घेतलेली आघाडी. दुसरी : काही केंद्रीय आणि राज्यस्तरीय प्रतिष्ठित संस्था वगळता बहुतेक विद्यापीठे आणि महाविद्यालये खासगी आहेत. तिसरी : महाराष्ट्रातील पुणे, मुंबई आणि नागपूर वगळता अन्य शहरांतील संस्था वेगवेगळ्या याद्यांत अपवादानेच आढळतात. चौथी : इंडियन इन्स्टिट्यूट्स ऑफ टेक्नॉलॉजी (आयआयटी) किंवा साधनांबाबत अजिबात कमतरता नसलेल्या खासगी संस्था आणि सरकारी विद्यापीठे व महाविद्यालये यांच्यात दिवसागणिक विषम होत चाललेली स्पर्धा.

राष्ट्रीय स्तरावरून क्रमवारी जाहीर करण्याचा गेल्या काही वर्षांपासून सुरू असलेल्या या उपक्रमामुळे देशातील उच्च शिक्षणाची गुणवत्ता उंचावण्यात कितपत मदत होते हे स्पष्ट करणारी आकडेवारी उपलब्ध नाही; परंतु क्रमवारीच्या याद्यांत स्थान मिळविण्यासाठी उच्च शिक्षण संस्थांना प्रेरणा मिळत असावी. अध्यापन-अध्ययनासाठीची साधनसामग्री, संशोधन, शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या पदवीधरांची स्थिती, बहि:शाल शिक्षण आणि सर्वसमावेशकता, आणि संबंधित संस्थांबद्दलचे शैक्षणिक क्षेत्रातील एकूण मत या पाच निकषांची पूर्तता उत्तम प्रकारे करणाऱ्या संस्थांना क्रमवारीत स्थान मिळते. ही पूर्तता करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या तुलनेत पुरेसे शिक्षक असण्याची आवश्यकता असते; तसेच पुरेसा निधीही उपलब्ध होणे गरजेचे असते. विशेषत: राज्य सरकारच्या अखत्यारितील बहुतेक विद्यापीठांमध्ये शिक्षकांची पदे रिक्त राहण्याचे प्रमाण अधिक आहे. त्यांना मिळणारा निधीही अपुरा आहे.

# भाषिक स्वैराचाराच्या संस्कृतीची विसंगती...

**'लोकसभा व राज्यसभेत प्रत्येक सभासदाला पूर्ण अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे. कोणत्याही शब्दांवर बंदी घातलेली नाही**

एकीकडे भाषा व संस्कृती मंडळ स्थापन करायचे, संस्कृतीबद्दल बोलायचे; पण स्वतः निवडून आल्यावर असभ्य, असंस्कृत बोलायचे आणि अनियंत्रित वागायचे यातून नेत्यांमध्ये दिसणारा नागरिकशास्त्र जगण्याचा अभाव जनतेने ओळखला पाहिजे आणि अशा लोकांना पुन्हा निवडून द्यायचे नाही, असे ठरवले पाहिजे.

एकीकडे भाषा व संस्कृती मंडळ स्थापन करायचे, संस्कृतीबद्दल बोलायचे; पण स्वतः निवडून आल्यावर असभ्य, असंस्कृत बोलायचे आणि अनियंत्रित वागायचे यातून नेत्यांमध्ये दिसणारा नागरिकशास्त्र जगण्याचा अभाव जनतेने ओळखला पाहिजे आणि अशा लोकांना पुन्हा निवडून द्यायचे नाही, असे ठरवले पाहिजे.



'लोकसभा व राज्यसभेत प्रत्येक सभासदाला पूर्ण अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे. कोणत्याही शब्दांवर बंदी घातलेली नाही. केवळ संसदीय कामकाजातून २०२०मध्ये असंसदीय ठरवून काढलेल्या शब्दांची यादी सचिवालयाने प्रसिद्ध केली आहे,' असे स्पष्टीकरण लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांना द्यावे लागले; कारण संसदीय कामकाजातून अनेक शब्द काळ्या यादीत समाविष्ट केल्याची माहिती संसदेच्या सचिवालयाने नुकतीच जारी केल्याच्या बातम्या सर्वत्र प्रकाशित झाल्या व त्यावर गदारोळ झाला. सरकारवर टीका करण्याचा अधिकारच काढून घेण्याची ही नवीन पद्धत आहे, असा आरोप केला गेला. काही शब्द 'असंसदीय' ठरवून, संसदेत अनेक शब्दांच्या वापरावर बंदी का आणावी लागते, हा प्रश्न यातून निर्माण झाला. संसदेतील सदस्यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर बंधने आणता येऊ शकतात का, हा प्रश्नही विचारात घेतला पाहिजे.

परस्परांना समजून घेणे व त्यासाठी भावना व्यक्त करण्यास वाव मिळणे, यातूनच संवाद होतो. 'हितार्थ बोलणे नित्य कुणाला न खुपेल असे' या पद्धतीने जबाबदारीचे भान ठेवून आपले म्हणणे मांडणे शक्य असते; पण अनेकांना तसा प्रयत्न करण्याचा धीर नसतो. चर्चा प्रश्न सोडविण्यासाठी असते, एकमेकांवर प्रश्न फेकून मारण्यास चर्चा म्हणता येत नाही. दर वेळी एखादी राजकीय लढाई जिंकावी, आपण जे बोलत आहोत त्यातून बातमी व्हावी, असा उद्देश ठेवून बोलल्याने चर्चा घडत नाही. संसदेत योग्य व समर्पक उत्तर देण्याची जबाबदारी सत्ताधारी पक्षावर असते. दर वेळी प्रश्नकर्त्याची टर उडवणे योग्य नाही. संसद ही समस्यांवर उपाय शोधण्याची जागा आहे, याचे भान अनेक लोकप्रतिनिधींना राहत नाही. अशोभनीय भाषा संसदेत वापरू नये असे म्हणताना, तशी भाषा कुठेच वापरू नये, हे पूर्ण सत्य लक्षात ठेवावे लागेल.

## ।। अभंगवाणी ।।



निंदी कोणी मारी ।  
वंदी कोणी पूजा करी ॥१॥  
मज हें ही नाहीं तें ही नाहीं ।  
वेगळा दोहीं पासुनी ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी गाळा क्रमांक 79-80 छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, संत तुकाराम नगर, अग्निशमन केंद्रासमोर, पिंपरी, पुणे - 411018. **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### “सत्तेशिवाय भाजपा माशासारखी तडफडत होती”; भास्कर जाधवांचा हल्लाबोल

। मुंबई ।। महाईन्यूज ।

थेट जनतेतून नगराध्यक्ष आणि सरपंच निवडीचं विधेयक आणणाऱ्या राज्य सरकारवर शिवसेनेचे नेते भास्कर जाधव यांनी जोरदार हल्ला केला. विशेष: एकनाथ शिंदेंना त्यांनी लक्ष्य केलं होतं. “एकनाथराव शिंदे तुम्ही नाव शिवसेनेचं घेताय आणि सर्व निर्णय व कार्यक्रम भाजपाचे राबवताय. गेल्या दीड दोन महिन्यातील असा एक निर्णय दाखवा, जो तुम्ही तुमच्या स्वत:च्या मनाने घेतलाय. सावध व्हा. कारभार करायचा तर स्वाभिमानाने करा”. असं म्हणत त्यांनी एकनाथ शिंदेसोबत भाजपावर निशाणा साधला आहे. स्वत:च्या मनाला विचारा आणि प्रत्येक गोष्टीत तोंड घालून स्वत: हसू करुन घेऊ नका”, असा सल्ला जाधवांनी शंभुराज देसाईंना दिला. या सल्ल्यानंतर देसाई चांगलेच संतापले. “काव काव करु नका”, अस म्हणत देसाईंनी जाधवांवर निशाणा साधला. शंभूराज देसाईंच्या काव काव उच्चारामुळे तुम्ही येणाऱ्या पितृपक्षाची तयारी करत आहात का”, असा टोला जाधवांनी त्यांना लगावला.

# “त्यांनी लाज - लज्जा सगळं सोडलं,” बंडखोरांवर उद्धव ठाकरेंनी डागली तोफ

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह 40 आमदारांनी बंडखोरी केल्यामुळे शिवसेनेचे उघड उघड दोन गट

।मुंबई।महाईन्यूज।

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह ४० आमदारांनी बंडखोरी केल्यामुळे शिवसेनेचे उघड दोन गट पडले आहेत. शिंदे गटाने भाजपासोबत युती करून राज्यात सरकार स्थापन केले आहे. तर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे गटाची एकनाथ शिंदे गटाविरोधात न्यायालयीन लढाई सुरू आहे. शिवसेनेमध्ये पुन्हा एकदा चैतन्य निर्माण करण्यासाठी शिवसेनेचे नेते आदित्य ठाकरे सध्या राज्याच्या दौऱ्यावर आहेत. तर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे शिंदे गटावर कठोर टीका करताना दिसत आहेत.**



**सध्या महाराष्ट्रच नव्हे तर देशातील सर्वसामान्यांच्या मनात चीड आहे. ज्या पद्धतीने ते आपल्याशी वागले आणि वागत आहेत ती हिंदुत्वाला साजेशी नाही. ते म्हणत होते की आम्ही हिंदुत्व सोडलं. पण त्यांनी लाज लज्जा सगळेचं सोडलेले आहे. त्यांना सत्ता म्हणजेच सर्वकाही असे वाटले होते. एकदा सत्ता आली की लोक जातात तरी कुठे, असे त्यांना वाटले होते.मात्र आता त्यांना मतदारसंघात जाणे अवघड झाले आहे. तुम्हाला काय कमी पडले होते, तुम्ही असे का केले? असे लोक त्यांना विचारत आहेत. या प्रश्नाला उत्तरं देताना त्यांच्या नाकीनऊ आले आहेत,” असे म्हणत उद्धव ठाकरे यांनी शिंदे गटाला लक्ष्य केले.**

आजदेखील (२२ ऑगस्ट) त्यांनी लाज, सज्जा सर्व सोडून दिली आहे, असे म्हणत बंडखोरांवर टीकेचे आसूड ओढले. ते मुंबईत समर्थकांना संबोधित करत होते. “सध्या महाराष्ट्रच नव्हे तर देशातील सर्वसामान्यांच्या मनात चीड आहे. ज्या पद्धतीने ते आपल्याशी वागले आणि वागत आहेत ती हिंदुत्वाला साजेशी नाही. ते म्हणत होते की आम्ही हिंदुत्व सोडलं. पण त्यांनी लाज लज्जा सगळेचं सोडलेले आहे. त्यांना सत्ता म्हणजेच सर्वकाही असे वाटले होते. एकदा सत्ता आली की लोक जातात तरी कुठे, असे त्यांना वाटले होते.मात्र आता त्यांना मतदारसंघात जाणे अवघड झाले आहे. तुम्हाला काय कमी पडले होते, तुम्ही असे का केले? असे लोक त्यांना विचारत आहेत. या प्रश्नाला उत्तरं देताना त्यांच्या नाकीनऊ आले आहेत,” असे म्हणत उद्धव ठाकरे यांनी शिंदे गटाला लक्ष्य केले.

आगामी काळात उद्धव ठाकरे महाराष्ट्राचा दौरा करणार आहेत. याबाबतही त्यांनी यावेळी माहिती दिली. “सध्या आदित्य ठाकरे महाराष्ट्रात फिरत आहेत. त्यानंतर मीदेखील महाराष्ट्रभर दौरा करणार आहे. सध्या शिवसेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांचा दौरा सुरू आहे. यानंतर गटप्रमुखांचा मेळावा घेण्यात येणार आहे. बघता बघता दसरा मेळावा येईल,” असे उद्धव ठाकरे म्हणाले. “पैसा संपेल मात्र निष्ठा कोठून आणणार? निष्ठेचा झरा कोठूण आणणार आहात? ही निष्ठा फक्त शिवसेनेतच आहे. आपण संघर्ष करू. आपण ज्यांना मोठे केले ते गेले. सामान्य माणसांची ताकद माझ्यासोबत आहे. म्हणूनच मला संकटांची चिंता नाही. पर्वा नाही,” असे म्हणत त्यांनी शिवसैनिकांना संघर्ष करण्याचे आवाहन केले.


# “आम्ही इथे गोट्या खेळायला आलो आहे का...”?

## विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात अजित पवारांचा संताप

।मुंबई । महाईन्यूज ।



विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनाचा आज तिसरा दिवस आहे. आज सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये अनेक मुद्द्यांवर शाब्दिक युद्ध पाहायला मिळत आहे. विरोधकांनी सत्ताधाऱ्यांना घेरण्याचा प्रयत्न केला. शिवाय, विरोधी पक्षनेते अजित पवार हे देखील सत्ताधाऱ्यांवर आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. अजित पवार आपला मुद्दा मांडत असताना सत्ताधाऱ्यांच्या बाकावरील काही आमदारांनी अडथळा आणला. त्यावेळी “अजित पवार यांनी आम्ही इथे गोट्या खेळायला आलो आहे का?”, असे अजित पवार यांनी म्हटले. सत्ताधाऱ्यांच्या आमदारांनी गोंधळ केला. त्यानंतर अजित पवार यांनी संताप व्यक्त करत “एक मिनिट, मघाशीच सांगितले आहे की तुम्हाला



पावसाळी अधिवेशन 2022

जे बोलायचे आहे ते नंतर उठून बोला”, असे म्हटले. त्यानंतरही काही सत्ताधारी बाकावरील आमदारांनी पुन्हा गधारोळ केला. त्यावेळी अजित पवार यांनी संबंधित आमदाराला “अरे थांब ना बाबा, तुलाच फार कळतंय का? आम्ही इथं गोट्या खेळायला आलो आहे का?” असा सवाल उपस्थित करत निशाणा साधला. “देवेंद्रजी मला तुम्हाला स्पष्ट सांगायचे आहे की, आपण मनाचा मोठेपणा दाखवा. पाठीमागच्या काळात देखील 25-15 चा निधी देण्याची कल्पना या नेत्यांच्या सुपिक डोक्यातून आली होती. 25-15 आणि ठोक तरतूद असे निर्णय घेण्यात आले. त्याचा वापर मी देखील मोठ्या प्रमाणात करून घेतला. त्याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. 25-15 चा निधी देताना आम्ही महाविकास आघाडीमधील लोकांना 5 कोटीचा निधी दिला, हे मी मान्य करतो. परंतु त्याचवेळी आम्ही तुमच्याकडून याद्या घेऊन तुमच्याही आमदारांना 2-2 कोटी रुपये दिले”, असेही अजित पवार यांनी म्हटले.

“तुमचं सरकार होतं तेव्हा पंकजा मुंडे ग्रामविकास मंत्री होत्या. त्यावेळी 25-15 चा निधी भाजपा आणि शिवसेनेच्या आमदारांना मिळाला होता. यानंतर उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील सरकार आलं तेव्हा खर्च न झालेला निधी थांबवला गेला आणि तो निवडून आलेल्यांना वाटण्यात आला हे मला चांगलं आठवतं. हे मी मान्य करतो”, असेही अजित पवार यांनी म्हटले.

# देवेंद्र और हम साथ साथ, मेरा भी नाम.., मुख्यमंत्र्यांची विरोधकांसमोर तुफान फटकेबाजी

।मुंबई । महाईन्यूज ।

राज्याच्या पावसाळी अधिवेशनाला सुरूवात झाली असून आज तिसरा दिवस सुरू आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत विरोधकांसमोर तुफान फटकेबाजी केली आहे. देवेंद्र और हम साथ साथ, मेरा भी नाम एकनाथ है, असं म्हणत एकनाथ शिंदेंनी विरोधकांवर निशाणा साधला आहे.

देवेंद्र और हम साथ साथ, मेरा भी नाम एकनाथ है, मी सक्षम नसतो तर एवढा मोठा कार्यक्रम केला असता का?, आमचा स्वत:चा अजेंडा नाही. जनतेची जी मागणी आहे तीच आम्ही पूर्ण करतोय. राज्यातील ९ हजार ग्रामपंचायतींनी सरपंच थेट जनतेतून निवडा असा ठराव केला होता. आमचे सरकार अल्पमतात गेले त्याचे पत्र पाठवलं त्यानंतर मविआ सरकारने



४०० जीआर काढले मग ते थांबवणार का नाही, असा सवाल एकनाथ शिंदेंनी विरोधकांना विचारला आहे. १९७४ मध्ये थेट नगराध्यक्ष जनतेतून निवडण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर १९८५ मध्ये हा निर्णय बदलत नगरसेवकांमधून नगराध्यक्ष निवडण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर २००६ मध्ये पुन्हा एकदा नगराध्यक्ष जनतेतून निवडण्याचा निर्णय तत्कालीन सरकारने घेतला. मविआत अनेक निर्णय घेतले गेले आणि बदलण्यात आले. परंतु अजित पवारांच्या मनातून हा निर्णय घेण्यात आलाय हे भाषणातून दिसत होते, असे एकनाथ शिंदे म्हणाले.

# काँग्रेसच्या नव्या अध्यक्षांची निवड 20 सप्टेंबरपर्यंत ; प्रक्रिया सुरु!

## कार्य समिती अंतिम तारीख ठरवणार

मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।



काँग्रेसच्या नव्या अध्यक्षांच्या निवडप्रक्रियेस रविवारी सुरुवात झाली. २० सप्टेंबरपर्यंत ही निवडप्रक्रिया कुठल्याही स्थितीत पूर्ण करणार, असा निर्धार पक्षाच्या निवडणूक यंत्रणेने व्यक्त केला. काँग्रेसच्या केंद्रीय निवडणूक समितीचे अध्यक्ष मधुसूदन मिस्त्री यांनी सांगितले, की पक्षाध्यक्ष निवडणुकीची अंतिम तारीख काँग्रेस कार्य समिती (सीडब्ल्यूसी) निश्चित करेल. २० सप्टेंबरपर्यंत कोणत्याही दिवशी ही निवड करण्यात येईल.

'सीडब्ल्यूसी'ने १६ एप्रिल ते ३१ मे २०२२ दरम्यान ब्लॉक समिती आणि प्रदेश काँग्रेस समितीच्या सदस्यांची निवडणूक, जिल्हा समिती अध्यक्ष व कार्यकारिणीची निवड १ जून ते २० जुलैदरम्यान व प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष व अखिल भारतीय काँग्रेस समिती सदस्यांची निवडणूक २१ जुलैपासून २० ऑगस्टपर्यंत करण्याचा निर्णय घेतला होता. अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या (एआयसीसी) अध्यक्षांची निवड २१ ऑगस्ट ते २० सप्टेंबरदरम्यान होईल.

मिस्त्री यांनी निर्धार व्यक्त करताना सांगितले, की या निवडणूक कार्यक्रमाची काटेकोर अंमलबजावणी होत आहे. आम्ही पक्षनेतृत्वाला हा निवडणूक कार्यक्रम पाठवला आहे. काँग्रेस अध्यक्षांच्या निवडणुकीची अंतिम तारीख 'सीडब्ल्यूसी' निश्चित करणार आहे. त्याची आता प्रतीक्षा सुरू आहे. ब्लॉक, जिल्हा, प्रदेश काँग्रेस समिती स्तरावर संघटनात्मक निवडणुका झाल्या आहेत का, असे विचारल्यावर मिस्त्री यांनी सांगितले, की या संदर्भातील प्रक्रिया पूर्ण झाली आहे. 'एआयसीसी' प्रतिनिधींच्या निवडीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. हे प्रतिनिधी पक्षाध्यक्षपदासाठीच्या निवडणुकीत मतदान करतील. 'सीडब्ल्यूसी' ही अंतिम तारीख जाहीर करेल. पक्षाध्यक्ष सोनिया गांधी व काँग्रेस पदाधिकाऱ्यांच्या मते २० सप्टेंबरपर्यंत काँग्रेसच्या नव्या अध्यक्षांची निवड पूर्ण होईल.

'जी-२३'चे लक्ष : दरम्यान, काँग्रेसमधील 'जी-२३' गट या निवडणूक प्रक्रिया आणि त्याच्या पारदर्शकतेवर बारकाईने लक्ष ठेवेल. गुलाम नबी आझाद, आनंद शर्मा, भूपेंद्रसिंह हुड्डा आणि मनीष तिवारींसह 'जी-२३' गटातील नेत्यांनी 'सीडब्ल्यूसी'पासून ब्लॉक स्तरापर्यंतच्या निवडणुका योग्य



# "मी पंतप्रधान बनायला नाही"

## गुजरातमधील प्रचारादरम्यान अरविंद केजरीवालांचं दावेदारीवरून स्पष्टीकरण

।नवी दिल्ली । महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी ।

आगामी गुजरात विधानसभा निवडणुकीसाठी सर्वच राजकीय पक्षांनी कंबर कसली आहे. त्यातच दिल्लीचे मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे संयोजक अरविंद केजरीवाल यांचा गुजरात दौरा सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. पंतप्रधान पदासाठी नरेंद्र मोदींना अरविंद केजरीवाल कडवं आव्हान देऊ शकतात, अशा चर्चा राजकीय वर्तुळात रंगल्या आहेत. या चर्चांना पूर्णविराम देत पंतप्रधान बनण्यास इच्छूक नसल्याचे अरविंद केजरीवाल यांनी स्पष्ट केले आहे. "मी पंतप्रधान बनायला नाही, तर भारताला जगात पहिल्या क्रमांकाचा देश बनवण्यासाठी आलो आहे" असे वक्तव्य गुजरातच्या अहमदाबादमध्ये प्रचारादरम्यान केजरीवाल यांनी केले आहे. महिनाभरात अरविंद केजरीवाल यांचा हा पाचवा गुजरात दौरा आहे. दिल्लीतील मद्यविक्री धोरणाबाबत सीबीआय चौकशीला सामोरे जाणारे दिल्लीचे उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांची केजरीवाल यांनी यावेळी पाठराखण केली. केंद्रीय संस्थांच्या मदतीने राजकीय विरोधकांना भाजपा लक्ष्य करत असल्याचा आरोप केजरीवालांनी केला.

"मनीष सिसोदियांना तीन ते चार दिवसात अटक होऊ शकते असं मी ऐकलं आहे. कुणास ठाऊक मलाही अटक केली जाऊ शकते. गुजरात निवडणुका डोळ्यासमोर ठेवून हे सर्व केले जात आहे", असा आरोप केजरीवाल यांनी यावेळी केला.

अरविंद केजरीवाल आणि मनीष सिसोदिया दोन दिवसीय गुजरात दौऱ्यावर आहेत.

# भारतीय नेत्यावर आत्मघातकी हल्ल्याच्या तयारीत असलेला इस्लामिक स्टेटचा अतिरेकी रशियाच्या ताब्यात

।नवी दिल्ली । महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी ।



भारतीय नेत्यावर आत्मघातकी हल्ल्याच्या तयारीत असलेला इस्लामिक स्टेटचा दहशतवाद्याला रशियाने ताब्यात घेतले आहे. हा अतिरेकी भारतातील सत्ताधारी पक्षातील नेत्यावर आत्मघातकी हल्ला करण्यासाठी भारतात येणार होता, त्यापूर्वीच रशियाने ही कारवाई केली. रशियातील फेडरल सिक्युरिटी सर्व्हिसने (FSB) दिलेल्या माहितीनुसार त्यांनी इस्लामिक स्टेट या आंतरराष्ट्रीय संघटनेच्या एका अतिरेक्याला ताब्यात घेतले आहे. तो मध्य आशियाईतील रहिवासी आहे. इस्लामिक स्टेटच्या अन्य अतिरेक्यांच्या मदतीने भारतीय नेत्यावर हल्ला करण्याची योजना आखली होती. भारतातील सत्ताधारी पक्षातील नेते त्याच्या टार्गेटवर होते. फेडरल सिक्युरिटी सर्व्हिसने या अतिरेक्याचा एक व्हिडीओही जारी केला आहे. या व्हिडीओत त्याने प्रेषक मोहम्मद यांच्या अवमान केल्याचा आरोप करत बदल्याच्या भावनेने हा हल्ला करणार असल्याचे म्हटले आहे. हा अतिरेकी एप्रिल ते जून दरम्यान टर्कीत होता, तिथेच एका इस्लामिक स्टेट नेत्याने त्याल आत्मघातकी बनण्याचे ट्रेनिंग दिले. इंस्तांबूलमध्ये त्यांच्या बैठका होत होत्या, अशी माहितीही फेडरल सिक्युरिटी सर्व्हिसेसच्या अधिकाऱ्यांनी दिली.

# डिजिटल क्षेत्रातील कंपन्यांची संसदीय समितीकडून चौकशी

## ॲपल, गूगल, ॲमेझॉन, नेटफ्लिक्स आणि मायक्रोसॉफ्टचा समावेश

।नवी दिल्ली । ।महाईन्यूज । प्रतिनिधी ।

डिजिटल क्षेत्रात मक्तेदारी निर्माण करणाऱ्या प्रथांचा अवलंब केल्याबद्दल चौकशी करणाऱ्या संसदीय समितीपुढे येत्या मंगळवारी ॲपल, गूगल, ॲमेझॉन, नेटफ्लिक्स आणि मायक्रोसॉफ्ट या कंपन्यांचे भारतातील प्रतिनिधी बाजू मांडण्यासाठी हजर राहणार असल्याची माहिती या समितीचे अध्यक्ष जयंत सिन्हा यांनी रविवारी दिली.



**बाजारातील स्पर्धेचे विविध पैलू, विशेषत: तंत्रज्ञान क्षेत्रातील बडय़ा कंपन्यांकडून अवलंबिल्या जाणाऱ्या व्यापार प्रथांवर संसदेच्या अर्थविषयक स्थायी समितीकडून लक्ष ठेवले जाते. लोकसभा सचिवालयाने जारी केलेल्या नोटिशीनुसार, संसदीय समितीच्या बैठकीच्या कार्यक्रम पत्रिकेवरील विषय हा बडय़ा तंत्रज्ञान कंपन्यांच्या प्रतिनिधींकडून मक्तेदारीच्या आरोपांबाबत त्यांची बाजू ऐकून घेणे, हा आहे. जपचे नेते आणि माजी केंद्रीय मंत्री असलेल्या सिन्हा यांनी सांगितले की, याप्रकरणी समितीने भारताच्या स्पर्धा आयोगाशी तसेच कॉर्पोरेट मंत्रालय आणि संबंधित कंपन्यांशीही चर्चा केली आहे.**

बाजारातील स्पर्धेचे विविध पैलू, विशेषत: तंत्रज्ञान क्षेत्रातील बडय़ा कंपन्यांकडून अवलंबिल्या जाणाऱ्या व्यापार प्रथांवर संसदेच्या अर्थविषयक स्थायी समितीकडून लक्ष ठेवले जाते. लोकसभा सचिवालयाने जारी केलेल्या नोटिशीनुसार, संसदीय समितीच्या बैठकीच्या कार्यक्रम पत्रिकेवरील विषय हा बडय़ा तंत्रज्ञान कंपन्यांच्या प्रतिनिधींकडून मक्तेदारीच्या आरोपांबाबत त्यांची बाजू ऐकून घेणे, हा आहे. जपचे नेते आणि माजी केंद्रीय मंत्री असलेल्या सिन्हा यांनी सांगितले की, याप्रकरणी समितीने भारताच्या स्पर्धा आयोगाशी तसेच कॉर्पोरेट मंत्रालय आणि संबंधित कंपन्यांशीही चर्चा केली आहे.

सिन्हा यांच्या अध्यक्षतेखालील या समितीने यापूर्वी खाद्यपदार्थ पुरवठादार स्विगी आणि झोमॅटो, ई कॉमर्स क्षेत्रातील फ्लिपकार्ट, कॅब ॲग्रिगेटर ओला, हॉटेल ॲग्रिगेटर ओयो यांसह ऑल इंडिया गेमिंग असोसिएशन आदींनाही चौकशीसाठी बोलाविले होते.

डिजिटल क्षेत्रातील मक्तेदारीसंबंधीच्या अनेक तक्रारींवर स्पर्धा आयोगाकडून सध्या चौकशी सुरू आहे. अशा प्रकरणांबाबत आयोगाने २८ एप्रिल रोजी संसदीय समितीपुढे सादरीकरण केले होते.

# मला पुरुषांची गरज नाही... असं म्हणत 'या' अभिनेत्रीने केलं स्वतःशीच लग्न

**सोशल मीडियावर हा फोटो शेअर करत कनिष्काने खाली भलं मोठ्ठ कॅप्शन देखील लिहिलं आहे. ज्यामध्ये तिने लिहिलंय की, "मी स्वताःशी लग्न केलं कारण, मी माझी सर्व स्वप्न पूर्ण केली आणि मी एकमेव व्यक्ती आहे, जिच्यावर माझं खूप प्रेम आहे.**


मागील काही दिवसांपूर्वी गुजरात मधील एका तरूणीने स्वतःशीच लग्न करून लोकांना आश्चर्यचकित केल होतं. दरम्यान, आता अशीच एक बातमी हिंदी टेलिव्हिजनमधूल समोर आली आहे. हिंदी टेलिव्हिजनवरील अनेक लोकप्रिय मालिकांमध्ये काम करणारी अभिनेत्री कनिष्का सोनी हिने देखील हे धाडसी आणि सर्वांना आश्चर्यचकित करणारा निर्णय घेतला आहे.

कनिष्का सोनीने केलं स्वताःशी लग्न

कनिष्का सोनीने आत्तापर्यंत दीया और बाती हम, पवित्र रिश्ता, देवी आदि पराशक्ति यांसारख्या अनेक लोकप्रिय मालिकांमध्ये काम केलं आहे. नुकताच तिने तिच्या सोशल मीडिया अकाऊंटवर स्वताःचा एक फोटो शेअर केला आहे. या फोटोमध्ये कनिष्काने गळ्यात मंगळसूत्र आणि भांगामध्ये कुंकू लावल्याचं दिसत आहे. तसेच तिने हा फोटो शेअर करत स्वताःशी लग्न केल्याचा खुलासा केला आहे.

मला पुरूषांची गरज नाही...

सोशल मीडियावर हा फोटो शेअर करत कनिष्काने खाली भलं मोठ्ठ कॅप्शन देखील लिहिलं आहे. ज्यामध्ये तिने लिहिलंय की, "मी स्वताःशी लग्न केलं कारण, मी माझी सर्व स्वप्न पूर्ण केली आणि मी एकमेव व्यक्ती आहे, जिच्यावर माझं खूप प्रेम आहे. त्यामुळे माझ्या सर्व प्रश्नांचे उत्तर एकच आहे की, मी फक्त स्वताःवर प्रेम करते. मला कोणत्याही पुरूषाची गरज नाही... मी नेहमी खूश आहे... एकटी आहे माझ्या एकांतामध्ये माझं गिटार माझ्यासोबत आहे. मी एक देवी आहे, जी खूप शक्तिशाली आणि मजबूत आहे. शिव आणि शक्ति सर्वकाही माझ्यातच आहे धन्यवाद"



# शिवस्तुती नृत्याविष्काराने रसिक मंत्रमुग्ध



देहावसान नृत्य, शिवस्तुतीवर नृत्यांगनांनी धरलेला ठेका, त्यातून होणारा नृत्याविष्कार शास्त्रीय नृत्यरसिकांनी अनुभवला. निमित्त होते, कीर्ती कला मंदिर आयोजित 29 व्या पंडित गोपीकृष्ण जयंती महोत्सवाचे. पंडित गोपीकृष्ण जयंती महोत्सवाचे उडान 'द अटर्नल बॉण्ड'चे द्वितीय पुष्प ज्येष्ठ नृत्यांगना पंडिता उमा डोग्रा यांच्या गंडा बंध शिष्या इंद्रायणी मुखर्जी यांनी तयार केलेली 'निर्वाना थ्रू डान्स पंडित दुर्गालाल' ही चित्रफीत दाखवून झाली. पंडित दुर्गालाल यांचे देहावसान नृत्य सादर करताना झाले होते. याबद्दल पंडिता उमा डोग्रा यांनी संवाद साधला.

यानंतर पंडिता उमा डोग्रा यांच्या विद्यार्थिनी इंद्रायणी मुखर्जी, सरिता कालेले, विनिता वेणूगोपाल यांनी मोहक शिवस्तुती सादर केली. जदेवांच्या गीतगोविंदमधील दुर्मिळ रचना अष्टपदी-सखी हे उमा डोग्रा यांनी सादर केले. त्यास रसिकांनी भरभरून दाद दिली. त्यानंतर राग बिहाद ह्या आधा त्रिताल समजल्या जाणाऱ्या 11 मात्रा असलेल्या तालाची प्रस्तुती त्यांच्या विद्यार्थिनींनी केली. ही रचना पंडित दुर्गालाल यांनी केली होती. या रचनेने कार्यक्रमाचा समारोप झाला. पंडित गोपीकृष्ण जयंती महोत्सवाच्या दुसऱ्या दिवसाची प्रारंभी प्रमुख अतिथी पंडित डॉ. अविराज तायडे यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी मंचावर रेखा नाडगौडा, अदिती पानसे उपस्थित होत्या. याप्रसंगी नंदकिशोर भुतडा, जयंत नाईक, डॉ अनिरुद्ध धर्माधिकारी, डॉ. पल्लवी धर्माधिकारी आदी उपस्थित होते. पियू आरोळे यांनी सूत्रसंचालन केले. कीर्ती कलामंदिर आयोजित २९ व्या नटराज पं. गोपीकृष्ण जयंती महोत्सवाला 'उडान' या शीर्षकाखाली गुरुवंदनेने शनिवारी (दि. २०) सकाळी प. सा. नाट्यगृहात प्रारंभ झाला. प्रणम्य शिरसा देवम या गणेशस्तुतीने महोत्सवाची पूजा बांधण्यात आली. छोट्या नृत्यांगनांनी नादारूप मोहक आविष्काराने गणेशाची विविध रूपे उलगडताना आकार शुद्धता, मूर्तता आणि अभिजातता दाखवून दिली.

# बिग बॉस फेम विशाल निकमचा नवा म्युझिक अल्बम

मराठी बिग बॉस मराठी हा कार्यक्रम नेहमीच चर्चेत असतो. या कार्यक्रमाच्या तिसऱ्या पर्वाचा विजेता अभिनेता विशाल निकम हा खूपच जास्त प्रसिद्धीच्या झोतात आला. सध्या अभिनेता विशाल निकमच्या मनात सध्या कुणीतरी घर केलं आहे असं बोललं जात आहेत. त्याच्या मनातील ती व्यक्ती नेमकी कोण हे लवकरच त्याच्या चाहत्यांना कळणार आहे. 'तू संग मेरे'(असं म्हणत विशालने आपल्या प्रेमाची सर्वांसमोर कबुली दिली आहे.



याची उत्सुकता विशाल निकमच्या चाहत्यांना सुद्धा आहे. व्हिडीओ पॅलेसची निर्मीती असलेल्या 'तू संग मेरे' या हिंदी रोमँटिक म्युझिक अल्बममध्ये अभिनेता विशाल निकम झळकणार आहे. दिशा परदेशी(DISHA PARDESHI) ही अभिनेत्री सुद्धा विशाल सोबत या म्युझिक अल्बम मध्ये झळकणार आहे.

विशाल निकमच्या या नव्या गाण्याचे हे बोल आहेत. या गीतातून त्याची दिशा सोबतची 'प्यारवाली' केमिस्ट्री प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. रोहितराज कांबळे याने लिहिलेल्या आणि संगीतबद्ध केलेल्या या गाण्याला हर्षवर्धन वावरे याने स्वरबद्ध केले आहे. त्याचबरोबर काश्मीरच्या नयनरम्य लोकेशन्सवर चित्रीत झालेल्या या गाण्याचे नृत्य दिग्दर्शन सुप्रसिद्ध नृत्य दिग्दर्शिका फुलवा खामकर हिने केले आहे. तर छायांकन अमोल गोळे यांनी केले आहे. अभिनेता विशाल निकम पहिल्यांदाच हिंदी म्युझिक अल्बम करतो आहे याच संदर्भात विशाल निकम म्हणाला, 'या हिंदी गाण्यासाठी व्हिडीओ पॅलेसने मला दिलेली ही संधी माझ्यासाठी खूप महत्त्वाची आहे'. असं विशाल म्हणाला तर याच संदर्भात अभिनेत्री दिशा परदेशीने(DISHA PARDESHI) सांगितले, हा वेगळा अनुभव याशूट दरम्यान मी घेतला. आमची लव्हेबल जोडी आणि हे रोमँटिक गाणं सर्वांना नक्कीच आवडेल' अशी अशा सुद्धा दिशा परदेशी हिने व्यक्त केली.



# मिस युनिव्हर्स स्पर्धेत आता विवाहित स्त्रियासुद्धा होणार सहभागी

या निर्णयामुळे आता इथून पुढे या स्पर्धेमध्ये केवळ अवाविवाहित स्त्रियाचं नाही तर विवाहित स्त्रिया देखील सहभागी होऊ शकतात. 1952 पासून सुरू झालेली मिल युनिव्हर्स ही स्पर्धा जगभरातील लोकप्रिय स्पर्धांपैकी एक आहे. यावर्षी भारताल्या हरनाज सिंधूने मिस युनिव्हर्स होण्याचा मान पटकावला. दरम्यान, आता या स्पर्धेबाबत काही नवीन निर्णय घेण्यात आला असून 2023 पासून मिस युनिव्हर्स स्पर्धेमध्ये विवाहिक महिला तसेच आई असणाऱ्या महिला देखील सहभागी होऊ शकतात. या निर्णयामुळे आता इथून पुढे या स्पर्धेमध्ये केवळ अवाविवाहित स्त्रियाचं नाही तर विवाहित स्त्रिया देखील सहभागी होऊ शकतात. आता, या ब्युटी पेजंटमध्ये सहभागी होण्यासाठी महिलांनाच्या स्वप्नाआड त्यांचे लग्न आणि मुलं ही कोणतीही कारणं येणार नाहीत. त्यामुळे विवाहित महिला आपलं मिस युनिव्हर्स होण्याचं स्वप्न आता नक्कीच पूर्ण करू शकतात. वर्षभर गर्भवती होऊ नये. आत्तापर्यंत या स्पर्धेमध्ये 18 ते 28 वयोगटातील महिला सहभागी होत होत्या.

## शॉर्ट न्यूज »

### ..अन् फिनिशिंग लाईनवर आनंदाश्रू ओघळले : आयर्नमन अश्विनी देवरे



नाशिक । महाईन्यूज

सरावापासून सुरू झालेला अत्यंत खडतर प्रवास जेव्हा फिनिशिंग लाईनवर येऊन थांबला तेव्हा आनंदाश्रू ओघळले.. फिनिशिंग लाईनला स्पर्श करताना माझ्या जीवनाचे सार्थक झाले... यासाठी दोन वर्षांपासून अत्यंत खडतर सराव केला, माझे ध्येय गाठण्यासाठी नोकरी, संसार सांभाळून १२-१२ तास सराव करणे नक्कीच मोठे दिव्य होते.. अशा शब्दांत आयर्नमॅन अश्विनी देवरे यांनी भावना व्यक्त केल्या.

नाशिक पोलीस आयुक्तालयातील व नाशिकरोड पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या अश्विनी गोकुळ देवरे यांनी नुकतीच कझाकीस्थान येथे झालेल्या आयर्नमॅन स्पर्धेत किताब पटकावला. त्यांनी संपूर्ण राज्यातून प्रथम महिला पोलीस कर्मचारी म्हणुन आयर्नमॅन म्हणून बहूमान मिळवला.

# दे घुमाके! शुबमन गिलच्या शतकी खेळीने मास्टर ब्लास्टरचा मोडला विक्रम!

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज ।

टीम इंडिया आणि झिम्बाब्वे यांच्यात आज तिसरा सामना रंगत आहे. दोन सामन्यात टीम इंडियाने बाजी मारल्यानंतर तिसऱ्या सामन्यात झिम्बाब्वेला व्हाईट वॉश करण्याच्या प्रयत्नात असेल. सलामीवीर शिखर धवनने दमदार खेळी करत आपला फॉर्म कायम राखला. तर लोकेश राहुलला नेहमीप्रमाणे मोठी खेळी करता आली नाही. परंतु शुबमन गिलच्या शतकी खेळीने मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरचा विक्रम मोडला आहे.




शुबमन गिल आणि इशान किशान यांनी १४० धावांची भागिदारी केली. इशान किशन दुसरे अर्धशतक झळकावत रनआऊट झाला. परंतु गिलने एकदिवसीय सामन्यातील पहिले शतक पूर्ण केले आहे. तर हिटमॅन रोहित शर्माने २०१० मध्ये पहिले शतक ठोकले होते. लोकेश राहुलने २०१६ मध्ये पहिले शतक झळकावले होते. राहुलनंतर गिलने आज उत्तम कामगिरी करत शतकीय खेळी केली आहे. गिलने सचिन तेंडुलकरचे २१ आणि २३ वर्षांपूर्वीचे दोन विक्रम मोडले आहे. ब्रॅड इव्हान्सने कर्णधार लोकेश राहुलचा त्रिफळा उडवला.

शुबमन गिल आणि इशान किशान यांनी १४० धावांची भागिदारी केली. इशान किशन दुसरे अर्धशतक झळकावत रनआऊट झाला. परंतु गिलने एकदिवसीय सामन्यातील पहिले शतक पूर्ण केले आहे. तर हिटमॅन रोहित शर्माने २०१० मध्ये पहिले शतक ठोकले होते. लोकेश राहुलने २०१६ मध्ये पहिले शतक झळकावले होते. राहुलनंतर गिलने आज उत्तम कामगिरी करत शतकीय खेळी केली आहे. गिलने सचिन तेंडुलकरचे २१ आणि २३ वर्षांपूर्वीचे दोन विक्रम मोडले आहे. ब्रॅड इव्हान्सने कर्णधार लोकेश राहुलचा त्रिफळा उडवला. त्यामुळे टीम इंडियाला ६३ धावांवर पहिला धक्का बसला. शिखर धवनला ६८ चेंडूंत ४० धावांवर इव्हन्सनेच माघारी पाठवले. वेस्ट इंडिज दौऱ्यावर शुबमनला ९८ धावांवर नाबाद असूनही पावसामुळे शतक पूर्ण करता आले नव्हते. परंतु त्याने आज शतक पूर्ण करत सल भरून काढली. टीम इंडियाकडून शतक झळकावणारा गिल हा १०२ आणि जगातला १०२२ वा खेळाडू ठरला आहे. रोहित शर्माने यापूर्वी २३ व्या वर्षांत २८ दिवसांचा सामन्यात झिम्बाब्वेत शतक झळकावले होते. शुबमनने १२३ धावा करताच हरारे येथे सचिन तेंडुलकरने २००१ मध्ये नोंदवलेला १२२ धावांची विक्रम तुटला. हरारे येथे टीम इंडियाची फलंदाजी सर्वोत्तम ठरली होती.




# अखिल भारतीय फुटबॉल महासंघावरील निलंबनाची कारवाई रद्द होण्याची शक्यता

।नवी दिल्ली।
महाईन्यूज ।

अखिल भारतीय फुटबॉल महासंघावरील निलंबनाची कारवाई रद्द होण्याची शक्यता वर्तवली जात असून त्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. काही दिवसांपूर्वी आंतरराष्ट्रीय फुटबॉल महासंघाने अखिल भारतीय फुटबॉल महासंघावर निलंबनाची कारवाई केली होती. परंतु आज सुप्रीम कोर्टात या प्रकरणी सुनावणी पार पडली. यामध्ये एआयएफएफच्या दैनंदिन व्यवहारांवर लक्ष ठेवण्यासाठी नियुक्त केलेली तीन सदस्यीय प्रशासकीय समिती न्यायालयाने रद्द केली आहे.

न्यायमूर्ती डीवाय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील सुप्रीम कोर्टाच्या खंडपीठाने आदेशात म्हटले की, एआयएफएफचे दैनंदिन व्यवस्थापनाचे काम केवळ कार्यकारी महासचिव यांच्या नेतृत्वाखालील एआयएफएफ प्रशासनाद्वारे पाहिले जाणार आहे. दरम्यान, एआयएफएफच्या निवडणुकांची तारीख देखील कोर्टाने एक आठवड्यासाठी पुढे ढकलली आहे. २८ ऑगस्ट रोजी एआयएफएफ निवडणूक होणार होती. परंतु कोर्टाच्या आदेशानुसार, निवडणूक मतदार यादीमध्ये केवळ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या ३६ सदस्यांच्या प्रतिनिधींचा समावेश असेल.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही